# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## परिपत्रक

**विषयः शैक्षणिक वर्ष 2020–21 पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेबाबत...**

आपणास विदितच आहे की, कोरोना – कोवीड 19 चा विषाणुच्या प्रार्दभाव देशात वाढल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक 24/04/2020 च्या मार्गदर्शक सुचनेनुसार शैक्षणिक धोरण राबविण्यात येत आहे. विद्यापीठाशी संलग्नित सर्व मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्था व विद्यापीठ अधिविभाग यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2020–21 मध्ये पदवी/पदव्युत्तर व पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेणा–या विद्यार्थ्याची विद्यापीठाच्या ऑनलाइन संगणकप्रणालीमध्ये प्रवेशाबाबतची सर्व माहिती भरावी. पात्रता फॉर्म व शुल्क भरण्याच्या तारखा दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे. विद्यार्थ्याने सदरची माहिती भरत असताना ज्या त्या अभ्यासक्रमामधील पात्रतेचे निकष विचारात घेवून पात्र होणा–या विद्यार्थ्यांनीच प्रवेशाबाबतची माहिती भरून Online Registration करावे. या करीता विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in संकेतस्थळावर संपर्क साधावा. Online Registration पात्रता अर्ज व शुल्क जमा झालेनंतर पात्रतेबाबतची पुढील कार्यवाही केली जाईल. पात्रता पूर्ण झालेशिवाय संबंधित विद्यार्थ्यांचे प्रवेश अंतिम होत नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे विद्यापीठाकडून पात्रता प्रलंबित राहिल्याने निकाल राखीव ठेवले जातात व यातून पुढे न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात याची नोंद घ्यावी.

महाराष्ट्र स्टेट बोर्ड यांच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती (Data) घेवून विद्यापीठाच्या संगणक प्रणालीमधून विद्यार्थ्यांच्या पात्रता अंतिम करावयाच्या असल्याने महाराष्ट्र स्टेट बोर्ड यांच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज व गुणतक्ते (केंद्रीय प्रवेश पद्धतीने प्रवेशित व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) विद्यापीठाकडे पाठविण्यात येवू नयेत. फक्त प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी विहीत मुदतीत Online पध्दतीने पाठविण्यात यावी. विहीत शुल्क Online पध्दतीने भरून पावती विद्यापीठ कार्यालयात जमा करण्यात यावेत. पात्रतेबाबतचे विहीत शुल्क हे विद्यापीठाच्या खात्यावर Online जमा करावे. मुदतीनंतर शुल्क जमा केल्यास विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार विशेष दंड आकारणेत येईल, याची नोंद घ्यावी.

केंद्रीय प्रवेश पद्धतीने प्रवेशित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे गुणतक्ते व जातीचा दाखला प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकित करून यादीसह इ–मेल/ पोस्टव्दारे पाठविण्यात यावे.

पात्रता अर्ज सादर करणेबाबतच्या मार्गदर्शक सुचना, अंतिम तारखा व शुल्क तक्ता, एम.फील./पी.एच.डी. प्रवेशपात्रतेबाबतची माहिती, परदेशी विद्यार्थी प्रवेशपात्रतेची माहिती, विद्यापीठ अनुदान आयोगाची प्रवेशाबाबतची अधिसुचना, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण महामंडळाकडून प्राप्त झालेल्या समकक्ष अभ्यासक्रमांच्या याद्या, मान्यताप्राप्त बोर्डाची, मान्यताप्राप्त विद्यापीठांची यादी, बनावट विद्यापीठांची यादी इ. माहिती सोबत जोडली असून त्याचे अवलोकन करून प्रवेशाबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी. तसेच यासंदर्भात वेळोवेळी प्रसिध्द होणारे शासन निर्णय व इतर शासकीय आदेश/परिपत्रके लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून ते सर्व संबंधित शिक्षक, विद्यार्थी व पालक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव
(डॉ.व्ही. डी. नांदवडेकर)

जा. क्रं./शिवाजी वि/पात्रता/ 547
दिनांक : 19 AUG 2020

**प्रति,**

1. प्राचार्य/संचालक,
   सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था

**Online** पात्रता अर्ज भरणेबाबतच्या सूचना खालीलप्रमाणे :

**A. प्राचार्य / प्रवेश समितीसाठी प्रवेश पात्रताबाबतच्या मार्गदर्शक सूचना :–**

**1)** इयता 12 वी चा निकाल घोषित झाल्याने प्रथम वर्ष शैक्षणिक वर्ष 1 सप्टेबर 2020 रोजी सुरू होत असल्याने प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळाद्वारे त्यांचा **Login** मधून नोंदणी करून ऑन लाईन पात्रता फॉर्म भरावेत. पात्रतेबाबतचे विहीत शुल्क विहित मुदतीत जमा करावे. मुदतीनंतर शुल्क जमा केल्यास दंडासहित जमा करावी. याची नोंद घ्यावी. महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी (दोन प्रतीमध्ये) खालील दिलेल्या तक्त्यानुसार विहीत मुदतीच्या आत विहीत शुल्काच्या पावतीसह विद्यापीठ कार्यालयात ऑफ लाईन / ऑनलाईन पध्दतीने जमा करावे.

## पात्रता फॉर्म विद्यापीठात सादर करावयांचा तारखांचा तक्ता

| अ. क. | तपशील | प्रकार | विहित मुदत | महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना | महाराष्ट्राव्यति – रिक्त अन्य राज्यातील (भारतातील) विद्यार्थी | परदेशी / अनिवासी भारतीय विद्यार्थ्यांना |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्व पदवी अभ्यासक्रम | नियमित शुल्क | 01 ते 19 सप्टेंबर, 2020 | रू. 75 /– | रू. 300 /– | रू. 500 /– |
| | | विलंब शुल्क | 20 ते 30 सप्टेंबर, 2020 | रू. 50 /– | रू. 100 /– | रू. 100 /– |
| | | विशेष विलंब शुल्क | 01 ते 07 ऑक्टोबर, 2020 | रू. 200 /– | रू. 300 /– | रू. 300 /– |

**टिपः–शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील व्यावसाईक अभ्यासक्रम व पदव्युत्तर, एम.फिल / पीएच.डी. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकीया सुरू झालेनंतर सुधारीत तारखा कळविण्यात येतील.**

**2)** शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील प्रवेशित सर्व संलग्नित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज online.shivajiuniversity.in **या** पोर्टलमधूनच भरावयाचे आहेत. महाराष्ट्र स्टेट बोर्ड यांच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती (Data) घेवून विद्यापीठाच्या संगणकप्रणालीमधून विद्यार्थ्यांच्या पात्रता अंतिम करावयाच्या असल्याने विद्यार्थ्यांनी Online Registration करत असताना विशेषतः बारावी बोर्डाचा बैठक क्रमांक, वर्ष, विद्यार्थ्याचे संपुर्ण नाव, व उत्तीर्णचा शेरा, एकुण गुण, टक्केवारी अत्यंत बिनचुकपणे लिहीणे आवश्यक आहे. यासंदर्भात प्रवेशित विद्यार्थ्याना त्यांच्या गुणपत्रकामध्ये नमुद असलेली माहीती बिनचुक भरणेबाबत विद्यार्थ्याना सुचना देण्यात याव्यात. तसेच विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी नमुद करावा.

**3)** शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात पदवी उत्तीर्ण झालेल्या व शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांनी Online Registration करत असताना त्यांच्या पदवी परीक्षेचे नाव PRN number, Seat Number, वर्ष व उत्तीर्णचा शेरा बिनचुकपणे लिहीणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी आपला मोबाईल क्रमांक व ई–मेल आयडी नमुद करावा.

**4)** महाराष्ट्र स्टेट बोर्ड यांच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांची माहिती (Data) घेवून विद्यापीठ संगणकप्रणालीमधून विद्यार्थ्यांच्या पात्रता अंतिम करावयाच्या असल्याने महाराष्ट्र स्टेट बोर्ड यांच्या बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पात्रता अर्ज व गुणतक्ते विद्यापीठाकडे पाठविण्यात येवू नयेत.

**5)** तथापि, केंद्रीय प्रवेश पध्दतीने प्रवेशित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे फक्त गुणतक्ते व जातीचा दाखला प्राचार्यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकित करून सोबत जोडावा.

**6)** जे विद्यार्थी महाराष्ट्र स्टेट बोर्ड व शिवाजी विद्यापीठाचे नाहीत, त्यांचे पात्रता अर्ज प्राचार्यांची स्वाक्षरी व गुणतक्त्यांच्या फोटोकॉपीसह ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठ कार्यालयात विहीत मुदतीत जमा करावेत. तसेच अशा विद्यार्थ्यांचे Original Migration Certificate व Transfer Certificate ची साक्षांकित

फोटोकॉपी सादर करणे बंधनकारक राहील. अशा विद्यार्थ्यांची यादी व अर्ज स्वतंत्र फाईलमध्ये सादर करावेत.

**7)** वरीलप्रमाणे पदवी/पदव्युत्तर परीक्षेस प्रवेश घेणा–या पात्रतेच्या निकषानुसार पात्र असणा–या विद्यार्थ्यांचे पात्रता महाविद्यालयाने Provisionally eligible करून पात्रता अर्जावर प्राचार्यांची स्वाक्षरी घेवून महाविद्यालयात ठेवावेत. विद्यापीठाकडे प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व यादीनुसार मुदतीत पात्रता शुल्क भरण्यात यावे. मुदतीनंतर शुल्क जमा केल्यास विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार विशेष दंड आकारणेत येईल, याची नोंद घ्यावी.

**8)** विद्यापीठ अधिविभाग व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये यांनी विद्यापीठ संलग्निकरण, मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांनाच विद्यार्थी प्रवेशित करावेत. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या विद्यार्थी संख्येपेक्षा (Intake) जादा विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीत प्रवेशित करून नयेत. असे झाल्यास सदर महाविद्यालयावर नियमानुसार कार्यवाही केली जाईल. संलग्नता मंजूरीचे व वाढीव तुकडीचे मान्यतापत्र सोबत जोडण्यात यावे.

**9)** प्राचार्य/ प्रवेश समिती यांनी प्रवेश देताना सबंधित विद्यार्थी ज्या–त्या अभ्यासक्रमास नियमानुसार पात्र आहे, का याची खात्री करूनच विद्यार्थ्यांचा प्रवेश अंतिम करावा. अपात्र विद्यार्थ्याचे प्रवेशपात्रतचे अर्ज Online Registration Cancel करावेत. अपात्र विद्यार्थी प्रवेशित झालेस याबाबत काही प्रश्न निर्माण झालेस त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही होणा–या परिणामांची संपूर्ण जबाबदारी संबधित महाविद्यालय व प्राचार्यावर राहिल.

**10)** परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेश पात्रतेबाबतची नियमावली सोबत जोडली असून त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**11)** एम.फील./पीएच. डी. च्या विद्यार्थ्यांची प्रवेशप्रक्रिया पुर्ण झालेनंतर Provisional Admission letter व सोबत जोडलेल्या परिपत्रकानुसार कागदपत्रे जोडून पात्रता अर्जासह विद्यापीठात एक महिन्याच्या आत सादर करावेत..

**12)** संबंधित महाविद्यालयात/अधिविभागात प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश काही कारणास्तव रद्द झाले आहेत अशा विद्यार्थ्यांची माहिती त्वरीत पात्रता विभागास कळविण्यात यावी. तसेच Online संगणक प्रणालीमध्ये Admission Cancel असा शेरा नमुद करावा.

**13)** नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ नियमानुसार हजेरीबाबत अट लागू असल्याने पूर्ण वेळ नोकरी करणा–या विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येऊ नयेत. त्याप्रमाणे सदर बाब पडताळणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहिल.

**14)** पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या नावनोंदणी (Online Registration) करत असताना पदवी अभ्यासक्रमाचा पुर्ण उल्लेख करावा. उदा. एम. ए. मराठी तसेच विद्यापीठात कार्यालयात सादर करणा–या विद्यार्थ्यांच्या यादीवर अभ्यासक्रमांचा स्पष्ट उल्लेख करून अभ्यासक्रमनिहाय यादी दोन प्रतीमध्ये सादर करावी.

**15)** प्राचार्य/ संचालक /अधिविभाग प्रमुख यांचे दंडक क्र. 22 कडे लक्ष वेधण्यात येते. या दंडकानुसार ज्या विद्यार्थ्यांनी पहिले सत्र समाप्ती पूर्वी आपले पात्रता प्रमाणपत्र प्राप्त केलेले नाही त्यांची सत्रे मान्य करण्यात येणार नाहीत तसेच ज्या विद्यार्थ्यांनी प्रचलित नियमानूसार महाविद्यालयात प्रवेश घेवूनही प्रथम सत्र समाप्ती पूर्वी पात्रता केलेली नाही अशा विद्यार्थ्याचे प्रवेष रद्द करावेत त्यांना पुढील वर्गात प्रवेश देवू नयेत.

**16)** Online Registration बाबत काही अडचणी आलेस विद्यापीठाच्या आय.टी. सेल (0231-2609335), परीक्षा विभाग यांचेकडून माहिती घ्यावी.

**17)** प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या व शुल्क भरलेली पावती विद्यापीठात सादर करणेबाबत पात्रता विभागाकडुन यथावकाष कळविण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या प्रवेशपात्रतेबाबत काही शंका असल्यास 0231–2609137/2609138 या फोनवर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

**B. नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेणा–या तसेच दूरशिक्षण कडून नियमित अभ्यासक्रमाकडे येणा–या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत सूचनाः–**

1) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरिता 10+2 किंवा समकक्ष (भारतातील व महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ सेकंडरी अॅण्ड हायर सेकंडरी एज्युकेशन, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे दोन वर्ष कालावधीचे अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी) **(परिशिष्ट 'अ' व 'ब')** अशी प्रवेश पात्रता असून पदव्युत्तर अभ्यासक्रमांना 10+2+3 किंवा समकक्ष याप्रमाणे प्राप्त केलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असण्याबाबत युजीसी यांचे निर्देश **(परिशिष्ट 'क')** येथे जोडण्यात आले आहेत.

2) दूरशिक्षणकडे प्रवेशित असणारे विद्यार्थी नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेत असलेस महाराष्ट्र शासनाच्या दि. 02/01/2018 व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.14/10/2013 रोजीच्या पत्रानुसार दूरशिक्षण अंतर्गत प्राप्त पदवीस युजीसी, डीईसी/ डीईबी यांच्या जॉईंट कमिटीची मान्यता असलेस त्याच पदव्या पुढील प्रवेशाकरिता ग्राह्य धरण्यात याव्यात. तसेच यासंदर्भातील विद्यापीठ अनुदान आयोगाचे दि. 11/03/2015 च्या अधिसुचनेनुसार कार्यवाही करणेत यावी.

3) डीईसी/डीईबी ची मान्यता नसलेल्या अन्य विद्यापीठातून व्यावसायिक किंवा तत्सम अभ्यासक्रम दूरशिक्षण अंतर्गत पूर्ण करून आलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी प्रवेश दिल्याचे निदर्शनास आलेस व नंतर अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाने अपात्र ठरविल्यास यातून काही कायदेशीर प्रकरणे उद्‌भवल्यास सबंधित महाविद्यालय जबाबदार राहील व यासंदर्भातील न्यायालयीन खर्च महाविद्यालयास आकारला जाईल याची नोंद घ्यावी. तसेच यासंदर्भात या कार्यालयाचे दि. 11/06/2012 चे परिपत्रक विचारात घेणेत यावे, याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

4) विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांची मान्यताप्राप्त केंद्रीय, राज्य, खाजगी व अभिमत विद्यापीठांची यादी **(परिशिष्ट 'ड')** जोडली आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे नोटिफिकेशननुसार कोणत्याही विद्यापीठास त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर संलग्न महाविद्यालय किंवा अभ्यासकेंद्र सुरू करता येणार नाही. आतापर्यंत विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी कोणत्याही विद्यापीठास त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर संलग्न महाविद्यालय किंवा अभ्यासकेंद्र सुरू करण्यास परवानगी दिलेली नाही. तेव्हा या सर्व बाबींची माहिती घेऊन विद्यार्थी व पालक यांनी प्रवेश घ्यावयाचा आहे.

**C. व्यावसायिक अभ्यासक्रम व केंद्रीय प्रवेश पदधती असणा–या अभ्यासक्रमाबाबत विशेष सूचनाः–**

1) केंद्रीय प्रवेश पध्दतीने प्रवेश होणा–या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या (अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, फार्मसी, आर्किटेक्चर, एम.बी.ए., एम.सी.ए., शिक्षणशास्त्र, विधी) प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी, त्यांचे बारावी गुणतक्ते व जातीचा दाखला **साक्षांकित फोटोकॉपी** यांसह विहीत मुदतीत शुल्कासह विद्यापीठ कार्यालयात जमा करणेत यावेत. तसेच Admission Regulating Authority (ARA) यांच्याकडून प्रवेश अंतिम झालेल्या मान्यतापत्र याद्या लवकरात लवकर विद्यापीठात जमा करणे बंधनकारक राहील. त्यानंतरच त्यांच्या पात्रता मंजूर केल्या जातील.

2) **शाखाबदलाबाबत :–** अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे (द्वितीय वर्ष पातळीवर) शाखाबदल संदर्भात परिपत्रक संपूर्ण माहितीसह सोबत जोडले आहे. त्यानुसार संलग्नित महाविद्यालयांनी कार्यवाही करणेची आहे.

**D. परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत :**

विद्यापीठाच्या अधिविभागामध्ये व संलग्नित महाविद्यालयामध्ये सुरू असणा–या अभ्यासक्रमास प्रवेश घेणा–या परदेशी विद्यार्थ्यांसाठीची नियमावली सोबत जोडली असून त्यानुसार परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत पुढील कार्यवाही करावी, तसेच यासंदर्भात काही शंका असल्यास Director, International Affair Cell (Contact No. 0231-2609165, Email-Id dir.iac@unishivaji.ac.in) यांचेशी संपर्क साधावा.

**कुलसचिव**